**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७२ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे<br>फ्लॅट क्र.३०३, बिल्डिंग क्र.८, रक्षकनगर,<br>फेज-२, नगर बायपास रोड, खराडी, पुणे-१४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ञ, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्र. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री. राजेंद्र विश्वनाथ शिंदे यांनी दि. ९.९.२००६ चे अर्जान्वये प्रमुख लिपिकाचे आर.आर., वरिष्ठ लिपिक पदावरील जेष्ठता क्रमांक मिळण्याविषयी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व महाराष्ट्र शासनाचे छायाचित्रण तज्ञ, पुणे-१ यांनी दि. ९.१०.२००६ चे पत्रान्वये हीच माहिती श्री. शिंदे वारंवार मागत असून वेळोवेळी ती त्यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे यांनी नमूद केले. तसेच परिपूर्ण माहिती दि. २७.५.२००८ रोजी मिळाली असून यापूर्वी केलेल्या अपिलानुसार (अपील क्र. पुणे ५४०) त्याच विषयाची माहिती असल्याने आता काही तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १० .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रत्नाकर मारूतराव भिलारे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर | हजर |

अपीलकर्ता श्री. रत्नाकर मारूतराव भिलारे यांनी प्रा. बी. डी. दुरूगकर यांच्या पदोन्नती संबंधी कागदपत्रांची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर यांच्याकडे मागितली होती.

सदरची माहिती दि. २४.१.२००७ रोजी, म्हणजेच मुदतीत दिली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर यांनी सांगितले. अपिलीय प्राधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेने आपले समाधान झाले व अपील निकाली ठेवावे, असे अपीलकर्ता श्री. रत्नाकर मारूतराव भिलारे यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.** १० .२.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२७.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७८४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. एम. एन. रोडगे,<br>योगेश निवास, बी फॉर्मसी कॉलेज जवळ,<br>बार्शी रोड, उस्मानाबाद | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | शिक्षण संचालक,<br>महाराष्ट्र राज्य पुणे -१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण संचालक,<br>महाराष्ट्र राज्य पुणे -१ | हजर |

अपीलकर्ता श्री. एम. एन. रोडगे यांनी उस्मानाबाद जिल्हा मागासवर्गीय शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना, उस्मानाबाद या संघटनेने पाठविलेल्या २७६ पानांच्या बुकलेटवर संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व संघटनेने दिलेल्या दि.०२.०२.२००७ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागितला होता.

जन माहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे -१ यांनी या संदर्भात जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी, उस्मानाबाद यांना संचनालयामार्फत अर्जदाराच्या अर्जावर चौकशी करुन झालेली अनियमितता, गैरप्रकार याबाबत अहवाल सादर करण्यास कळविले असल्याचे तसेच माहिती स्थानिक पातळीवरची असून उपलब्ध करुन देणे विषयी पाठपुरावा केला असल्याचे त्यांनी नमूद केले अपीलकर्ता गैरहजर होता. तसेच त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यांची मागणी प्रामुख्याने कार्यवाही संबंधी असून त्याबाबतची माहिती अपिलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.तक्रार अर्ज व अहवालावर केलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ अपीलकर्त्याला द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. १० /०९/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता:

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७९६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | डॉ.दिलीप मदारीलाल कनोज<br>पिंपरी चिंचवड म.न.पा.तालेरा रुग्णालय,<br>काकडे पार्क समोर, तालेरा नगर,<br>चिंचवड -३२ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | आरोग्य अधिकारी, पिंपरी चिंचवड म.न.पा.,<br>पिंपरी- ४०००१८ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड,<br>म.न.पा., पिंपरी-४०००१८ | हजर |

अपीलकर्ता डॉ.दिलीप मदारीलाल कनोज यांच्या जानेवारी १९९९ पासूनच्या मासिक पगार बिलाच्या प्रती श्री.रामदास वामन बनसोडे यांनी मागितल्या होत्या. त्रयस्थ पक्ष म्हणून त्या देण्यास डॉ.कनोज यांनी हरकत घेतली होती व त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. त्याविरुध्द श्री.बनसोडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड, म.न.पा. पिंपरी यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी अपील मान्य करुन कागदपत्रे देण्याचा आदेश दिला. त्याविरुध्द डॉ.कनोज यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंचे त्यावेळी एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

डॉ.कनोज यांचे पद ज्येष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याचे आहे व त्या पदाचा ते पगार घेत नाहीत असे प्रतिपादन श्री.बनसोडे यांनी केले. मात्र आपण त्याच पदाचा पगार घेत असून अन्य पदाचा पगार घेत नाही, असे डॉ.कनोज यांनी नमूद केले.

श्री.बनसोडे व डॉ.कनोज हे परस्परांविरुध्द सातत्याने विविध पातळ्यांवर तक्रारी, अर्ज करीत आले असून आयोगाकडे यापूर्वीही अनेक अपिले श्री.बनसोडे यांनी केली आहेत. आयोगासमोर दोघांनीही परस्परंविरुध्द वापरलेली भाषा व आविर्भाव याबद्दल दोघांनाही समज द्यावी लागली, यावरुन त्यांच्यातील व्यक्तिगत वादाचे स्वरुप स्पष्ट होते. परस्परातील वादाचा एक भाग म्हणून माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात असल्याचे या प्रकरणातून स्पष्ट दिसते. त्या अनुषंगाने श्री.बनसोडे यांना आयोगाने यापूर्वी समजही दिलेली आहे. आपली वैयक्तिक माहिती मागितली असून ती देऊ नये, अशी भूमिका डॉ.कनोज यांनी प्रत्येक अर्जाबाबत घेतली आहे. परंतु डॉ.कनोज हे पिंपरी चिंचवड महापालिकेत ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यांच्या सेवाविषयक माहितीची मागणी वैयक्तिक स्वरुपाची ठरणार नाही, त्यामुळे ती द्यावी लागेल.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) डॉ.दिलीप मदारीलाल कनोज यांच्या मासिक पगार बिलाची माहिती अर्जदार श्री.रामदास वामन बनसोडे यांना नि:शुल्क देण्यात यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२४.९.२००८**

सप्टेंबर-६८-६९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | १) श्री.मोहन भिकोबा मचाले व इतर<br>मु. पो.शेटफळगढे, ता.इंदापूर, जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, इंदापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, इंदापूर | हजर |

मौजे शेटफळगढे, ता.इंदापूर, जि.पुणे येथील गट क्र.३५१, ३५२ च्या अतितातडीच्या मोजणी संदर्भात हद्दीच्या खुणा दाखवून कायम का करण्यात आल्या नाहीत, या संदर्भात १ ते ६ विषयांची माहिती अपीलकर्ता श्री.मोहन भिकोबा मचाले यांनी मागितली होती. त्यामध्ये सर्व्हे क्र.५९ एकत्रीकरणाचे जबाब नकला, दि.२७.०३.२००६ रोजी केलेल्या मोजणी नकाशाची प्रमाणित ' क ' प्रत, ती का देण्यात आली नाही त्याची कारणे, त्यासाठीची विहित कालमर्यादा व संपूर्ण प्रकरण प्रलंबित राहण्याची कारणे याचा समावेश होता. सदरचा मूळ अर्ज दि.०८.०२.२००७ चा असून दि.१७.०३.२००७ च्या पत्राने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, इंदापूर यांनी उत्तर दिले. त्यामध्ये जमीन एकत्रीकरण खाते उतारा जबाबाची नक्कल शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्यास कळविले. इतर मुद्दे हे मोजणीसंबंधीच्या प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत, व त्या अनुषंगाने कारणांची विचारणा श्री.मचाले यांनी केली आहे. मोजणी प्रकरणास विलंब झाल्याचे तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी कबूल

केले असून त्याबद्दल संबंधित भूकरमापक यांच्यावर कारवाई प्रस्तावित केल्याचे त्यांनी श्री.मचाले यांना कळविले आहे. परंतु ही माहिती देण्यातील विलंब नसून मोजणी प्रकरणातील विलंब आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत : मंजूर.
२. मोजणी प्रकरणासंबंधी विहित मुदतीत कार्यवाही न केले बाबत तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी भूकरमापक यांच्यावर काय कार्यवाही झाली याचा सविस्तर अहवाल दि.३०.०९.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा. त्याची एक प्रत श्री.मचाले यांना द्यावी.
३. जमीन एकत्रीकरण खाते उतारा जबाब नक्कल निःशुल्क तत्काळ अपीलकर्त्यास द्यावी.

पुणे
दि. १६/०९/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १७.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती आशालता नामदेव ढोबळे<br>अभिजीत अपार्टमेंट, रूम नं.११, मुक्ताई रोड<br>मु. पो.नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशिक्षणाधिकारी ( माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ),<br>जिल्हा परिषद, पुणे | हजर |

अपीलकर्त्या श्रीमती आशालता नामदेव ढोबळे यांनी दि. १९.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडे शिक्षणाधिकारी यांनी सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात दिलेली येडेश्वर विद्यामंदिर, येडगांव या शाळेतील शिक्षक मान्यतेची नोटिंगसह स्थळप्रत मागितली होती.

टिप्पणी उपलब्ध होत नाही, असे अपीलकत्याचे प्रतिनिधी यांनी माहतीबाबत मत नोंदविले आहे. वैयक्तिक मान्यता प्रस्तावानुसार कार्यवाही करावी, ही अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तसेच अपील निकाली काढण्यास मान्यता दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २९.९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ७.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपील-कर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८१७ / सोलापूर | श्री.हणमंत नागनाथ खांडेकर मु.पो. गोटेवाडी, मोहोळ, जि.सोलापूर | निवासी नायब तहसीलदार, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर | तहसीलदार, मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर | प्रकल्प ग्रस्ता-कडून संपादित केलेल्या व धरण ग्रस्तांकडून वाटप करण्यात आलेल्या जमिनीचे हस्तलिखित ७/१२ व ६ड माहिती मिळणेबाबत | तीनही घटकांत चर्चा होऊन अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे निवेदनात नमूद केले आहे. |
| २ | ६९२ / सोलापूर | श्री. रामकृष्ण धोंडीबा नायकोडे मु.पो.पोथरे, ता.करमाळा, जि. सोलापूर | प्रमुख लिपिक जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | सन २००५ ते माहे सप्टेंबर २०० या कालावधीत ग्रामपंचायत, पोथरे व ग्रामपंचायत जाधववाडी (मोडलिंब) येथील सरपंच पदाच्या अनुषंगाने माहिती | अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत निवेदनात नमूद केले आहे. |
| ३ | ६५६ / सोलापूर | श्री. संदिप पांडुरंग शितोळे रा. ३१८, प्रभाकर महाराज मंदिर, महेश नगर समोर, बुधवार पेठ, सोलापूर | तहसीलदार संजय गांधी सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | निवासी उप जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | वृध्दापकाळ योजनेच्या मंगळवेढा, अक्कलकोट, माढा, पंढरपूर, करमाळा, द.सोलापूर व ३ सोलापूर येथील तहसील कार्यालया - तील गैरव्यवहारा बाबत एकूण चार मुद्दयांची माहिती | प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर फेर अर्ज सादर करीन असे अपीलकर्त्याने निवेदनात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६७० / सोलापूर | श्री. सखाराम यल्लाप्पा केसकर रा.ब्लॉक नं. एल-८, सुखसेनगर, कुमठा नाका, सोलापूर | अव्वल कारकून (आस्था) उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर | उपविभागीय अधिकारी, सोलापूर, जि.सोलापूर | जमिनीच्या फेर फार नोंदी संबंधात अपील दाखल केल्यानंतर किती दिवसात निकाल दिला जातो, व आरटीएस/८५/०३ या केसचा निकाल कधी लागेल. | अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत होत नाही. तसेच अपील-कर्त्याने प्रथम अपील केले नाही. त्यामुळे अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्यानेच नमूद केले आहे. |
| ५ | ६२४ / सोलापूर | श्री. मुकुंद डोंगरी काटे रा. ४७८, आवसेवस्ती, लक्ष्मीपेठ, सोलापूर | अन्न धान्य वितरण अधिकारी, सोलापूर | अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर | श्री. अरूण संभाजी सोनटक्के, रा.आवसेवस्ती यांच्या नावावर परिमंडल क्र. मध्ये ड-३ व ड-५८ येथील रेशन कार्डच्या अनुषंगाने माहिती | अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.१०.१२.२००७ रोजी कळविले. दि.७.१०.२००८ रोजीच्या निवेदनात ही वस्तुस्थिती नमूद केली. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १६ .१०.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे ' विशेष अपील निर्गत कार्यक्रम ' दिनांक २४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.भरत निवृत्ती बाठे<br>रा.स.नं.२०/२१,गुरुदत्त अपार्टमेंट<br>पवार हॉस्पिटल समोर,<br>बालाजीनगर,धनकवडी,पुणे-४३ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक,<br>तालुका भूमी अभिलेख, भोर, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक,<br>भूमी अभिलेख कार्यालय, पुणे | हजर |

मौजे कापूरहोळ येथील जमिनीबाबत एकत्रीकरण भूमापन सहाय्यक अधिकारी, सासवड यांनी फेरफार नं.९७९ नुसार श्री.मारुती गणपत बाठे यांच्या दि.०१.०६.१९७४ रोजी घेतलेल्या लेखी जबाबाची नक्कल मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.भरत निवृत्ती बाठे , रा.स.नं.२०/२१,गुरुदत्त अपार्टमेंट, पवार हॉस्पिटल समोर, बालाजीनगर,धनकवडी,पुणे-४३ यांनी केली होती.

सदर जबाब हे त्या वेळीच्या प्रकरणामध्येच नसल्याने देता येत नाही, वास्तविक सदर जबाब हा श्री.शरद निवृत्ती बाठे यांचा असून तो अपीलकर्ता स्वीकारत नाहीत, असे प्रतिपादन

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, तालुका भूमी अभिलेख, भोर, जि.पुणे यांनी केले.

वरील चर्चा, कागदपत्रे पाहता मूळ दप्तरीच जबाब नसल्याने तो देता येत नाही, हे दिसून येते. अभिलेख दुरुस्तीबाबत अपीलकर्त्याची मुख्य मागणी असून त्यासाठी अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे अपील करण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली ठेवण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २४-०९-२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३३ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.वासुदेव कोंडुमल इदनानी<br>२७/३,पी.डब्ल्यू.डी.क्वार्टर्स,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे -१८ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रशासकीय अधिकारी,<br>शिक्षण विभाग,<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका,<br>पिंपरी, पुणे -१८ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण उप संचालक,<br>१७, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,<br>पुणे -१ | हजर |

अपीलकर्ता श्री.वासुदेव कोंडुमल इदनानी, रा.२७/३,पी.डब्ल्यू.डी.क्वार्टर्स, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे -१८ यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे जयहिंद प्रा.शाळेकडून आकारण्यात येणाऱ्या अवाजवी फीबाबत केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

सदरची शाळा विनाअनुदानित व अल्पसंख्यांक असल्याचे संपूर्ण माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेऊन देण्यास विलंब झाला, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यास दि.२०.०९.२००६ व ११.१२.२००७ रोजी समक्ष माहिती दिली असून पोच दप्तरी दाखल आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा खुलासा ग्राह्य धरुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे. :

**आदेश**

१) अपील निकाली काढणेत येत आहे.
२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिल्याची पोच आयोगास त्वरीत सादर करावी.

**पुणे**
**दिनांक : २४-०९-२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती राधा किसन गर्ग<br>२८९, गणेश पेठ, अल्पना टॉकीज समोर, पुणे-२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि.पुणे-२ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, हवेली, जि.पुणे-२ | हजर |

अपीलकर्ता श्रीमती राधा किसन गर्ग यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या समान विषयांच्या अपिलाच्या अनुषंगाने यापूर्वी आयोगाने अपील क्र.४९५/पुणे मध्ये दिलेला निर्णय कायम ठेवण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २५/०९/२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २७.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. निळकंठ सहदेव गोरडे<br>सी ५/७६, शांतीरक्षक सोसायटी, येरवडा, पुणे-६ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | माहिती अधिकारी, अपंग कल्याण आयुक्तालय, समाजकल्याण इमारत, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, अपंग कल्याण आयुक्तालय, समाजकल्याण इमारत, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. निळकंठ सहदेव गोरडे यांनी जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, अपंग कल्याण आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे दि. ३.२.२००७ रोजी अर्ज करुन दि. १२.१.२००७ रोजीच्या अर्जाची प्रत, तसेच अर्जावर विचार झाला किंवा कसे, अर्जावर कशा प्रकारे दखल घेतली जाते, इत्यादी माहिती मागितली होती.

अपीलकर्त्यास मुद्या क्र.१ ची माहिती दिली आहे. अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ या बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या आहेत. त्यामुळे त्या माहितीच्या अधिकारात येत नाहीत, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २३ .९.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.गिरीष दिगंबर संगमनेर,<br>संगम रेफ्रिजरेशन अँड एअर कंडीशनींग सर्व्हीसेस प्रा.लि., ५५४, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप आयुक्त (तांत्रिक), पुणे महानगरपालिका, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.गिरीष दिगंबर संगमनेर यांनी पुणे महानगरपालिकेतील इलेक्ट्रीक्स विभागातील बालगंधर्व रंगमंदीर, पुणे येथील वातानुकूलित करण्याबाबतच्या कामाचे बिल न मिळण्याबाबत माहिती मागितली होती.

प्रथम अपिलावर निर्णय देताना अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांनी दि.१८.०५.२००७ रोजीच्या आदेशात अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे कागदपत्रे देण्यात यावीत. त्याचप्रमाणे १५ दिवसांत रक्कम अदा करण्याचा आदेश दिला होता.

अपीलकर्त्यास माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त, तांत्रिक विभाग, पुणे महानगरपालिका व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्याने माहिती मिळाली आहे व त्यानुसार अपील मागे घेत आहे, असे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १० /०९/२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २४.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.यशवंत रावजी जगताप,<br>मु.पो.काऱ्हाटी,ता.बारामती,जि.पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय बारामती,जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार,<br>तहसील कार्यालय बारामती,जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री.यशवंत रावजी जगताप, मु.पो.काऱ्हाटी, ता.बारामती, जि.पुणे यांनी दि.२४.०१.२००७ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय बारामती,जि.पुणे यांचेकडे गट नं.१०२३ चे ७/१२ उतारे, फेरफार व इतर माहिती मागणी केली होती. त्यानुसार माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय बारामती,जि.पुणे यांनी जन माहिती अधिकारी यांना विलंबाबद्दल ताकिद दिल्याचे निकालावरुन स्पष्ट होते. जन माहिती अधिकारी यांनी ऊर्वरीत माहिती तलाठ्याकडून प्राप्त करुन देणे, अपीलकर्त्यास स्पष्ट व मुद्देसूद उत्तर देणे अपेक्षित आहे. उपलब्ध कागदपत्रे, निवेदने पाहता

मुद्दा क्र.१ ची माहिती दिल्याचे दिसते. ऊर्वरीत मुद्यांची माहिती अभिलेखानुसार स्पष्टपणे देता येणे शक्य होते, असे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील अंशत : मान्य.

२) मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ विषयी स्पष्ट माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ८ दिवसात देऊन आयोगाला अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. : २४-०९-२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. २७.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नाव | अपिलीय प्राधिकारी यांचे नाव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८८७ / पुणे | श्री. वसंत आबासाहेब गरड, रा. प्लॉट नं.३४, सर्व्हे क्र.४७, विवेकनगर, आकुर्डी, पुणे ४११ ०३५ | जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे | अपिलीय प्राधिकारी द्वारा न्या. आर.जे. कोचर, टास्क फोर्स, भुदरगड नागरी पत संस्था गारगोटी | टास्क फोर्स कमिटीच्या अनुषंगाने माहिती |
| २ | ८८८ / पुणे | श्री. वसंत आबासाहेब गरड, रा. प्लॉट नं.३४, सर्व्हे क्र.४७, विवेकनगर, आकुर्डी, पुणे ४११ ०३५ | जन माहिती अधिकारी, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे | अपिलीय प्राधिकारी द्वारा न्या. आर.जे. कोचर, टास्क फोर्स, भुदरगड नागरी पत संस्था गारगोटी | प्रशासकाने अर्जदारां-कडून वसूल केलेल्या कर्जाचा व ठेवीदारांच्या रक्कम वाटपासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती |
| ३ | १०६४ / पुणे | श्री. वसंत आबासाहेब गरड, रा. प्लॉट नं.३४, सर्व्हे क्र.४७, विवेकनगर, आकुर्डी, पुणे ४११ ०३५ | उप निबंधक सहकारी संस्था (नागरी बंका-२) महाराष्ट्र राज्य,पुणे | अप्पर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूक ) | भुदरगड नागरी सह. पतसंस्था, गारगोटी थकित कर्जदारांच्या वसूलीसाठी मालमत्तेच्या जाहीर लिलावाबाबत माहिती |
| ४ | १०५३/ पुणे | श्री. वसंत आबासाहेब गरड, रा. प्लॉट नं.३४, सर्व्हे क्र.४७, विवेकनगर, आकुर्डी, पुणे ४११ ०३५ | जन माहिती अधिकारी, प्रादेशिक सह संचालक (साखर) कोल्हापूर, विभाग, कोल्हापूर | प्रादेशिक सह संचालक, (साखर) कोल्हापूर, विभाग, कोल्हापूर | मौजे बेनाडी ता. चिकोडी येथील स.नं. २१४ या संयुक्त मालकीच्या ऊस गाळपासाठीचे पैसे मिळण्या बाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती. |

अपीलकर्ता मयत झाला असल्याचे अन्य अपिलात (अपील क्र. ८३५ / पुणे ) जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगास कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
दि. १६.९.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९९/पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुधीर माधव जोशी<br>५८७, दत्तप्रसाद सोसायटी, पुणे-सिंहगड रोड, पुणे -३० | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | पोलीस निरीक्षक,<br>खंडाळा पोलीस ठाणे, जि.सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | पोलीस उप अधिक्षक,<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, जि.सातारा | गैरहजर |

अपील दि.०७.०७.२००५ रोजी सौ.सुमती माधव जोशी यांनी श्री.मारुती कृष्णा ढमाळ यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारी संबंधी कार्यवाहीची, तसेच जाबजबाबांची माहिती मागणी केली होती. (१७.११.२००६ चा अर्ज)

सदरच्या चौकशीचे ऐन कागदपत्रे खंडाळा पोलीस स्टेशन येथे आढळ झाली नाहीत, म्हणून पोलीस निरीक्षक, खंडाळा पोलीस स्टेशन यांनी पुन्हा जाबजबाब घेऊन दि.१४.१२.२००६ च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविल्याचे श्री.एस.पी.जाधव यांनी पोलीस अधिक्षक, सातारा , श्री. प्रकाश प्र.मुत्त्याळ यांच्या वतीने पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १२/०९/२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि ०८.१०.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९१०/ सोलापूर | श्री. बाळासो आनंदा जानकर मु.पो. शिवणे, ता. सांगोला, जि. सोलापूर | सचिव, शिवणे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या, शिवणे, ता. सांगोला, जि. सोलापूर | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर | शिवणे विकास कार्यकारी सोसायटी च्या चालू वर्षाच्या निवडणूक कार्यक्रमाची माहिती, सर्व सभासद हस्तांतरात यादी, सन १९८० ते २००४ निवडणूक कार्यक्रम यादी, संस्थेच्या कर्जवाटपाची रक्कम व कर्जदार यादी, सन २००४ ते ०८ पर्यंत फळबागांसाठी केलेल्या कजपुरावठयाची यादी, सन १९७९-२००८ ऑडिट रिपोर्ट सन २००४ ते २००८ थकित कर्जदार यादी इत्यादी. | अपीलकर्त्यास शुल्क भरून माहिती घेवून जाण्याबाबत कळवूनही संस्थेशी संपर्क साधला नसल्याचे, तसेच पत्रव्यवहार स्वीकारण्यास तयार नसल्याने आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. माहिती देण्याची तयारी दोघांनी दर्शविली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ९५४/सोलापूर | श्री. गणेश ज्ञानोबा बोड्डू १७६०,ई ग्रुप.विडी कामगार घरकूल, हैदराबाद रोड, सोलापूर | चेअरमन, नदाफ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सिध्देश्वर पेठ, सोलापूर | उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर | दि ३१.०३.२००६ ते ३१.०३.२००७ संस्था ऑडिट रिपोर्ट, महिला संचालिका नावे, अनुसूचित जाती व जनजाती संचालक नावे, दुर्बल घटक संचालक यादी, संचालक प्रतिज्ञापत्र, संस्था सभासद अर्ज नमुना, शेअर्स व प्रवेश फी रक्कम माहिती. | तीनही घटकांमधील चर्चेत दि. ७.१०.२००८ रोजी कार्यक्रमावेळी माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यातील अपिले ( क्रमांक १ व २ ) निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.३१.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१७ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.दत्तात्रय काशिनाथ सांडभोर,<br>प्लॉट नं.११, वैद्य कॉलनी, तळेगांव दाभाडे,<br>ता.मावळ, जि. पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, मावळ,<br>जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय काशिनाथ सांडभोर यांनी मौजे तळेगाव, ता.मावळ येथील गट क्र.५३४९ व ५३५२ च्या मोजणी संबंधी माहिती मागितली होती. प्रत्यक्ष मोजणीच्या मापाची माहिती मिळण्याबाबत अर्ज असून मोजणी योग्य रीतीने केली नसल्याची त्यांची तक्रार आहे. मूळ वसलेवाराप्रमाणे मापे दर्शविली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, जि. पुणे यांनी प्रथम अपिलातील निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता यांच्या समक्ष मूळ आलेख व वसलेवार दाखवून हे स्पष्ट केल्याचेही म्हटले आहे. अभिलेखानुसार माहिती दिली आहे. परंतु ती नोंद चुकीची असल्याची तक्रार असल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार त्यांनी दाद मागणे, व द्वितीय अपील सुपर निमताना मोजणी करुन घेणे योग्य ठरेल, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, पुणे यांनी नमूद केले. प्रत्यक्ष मोजणीची मापे व नकाशावरील मापे यात तफावत

असल्यास खोटी माहिती दिल्याचा आक्षेप योग्य ठरेल. मात्र उपलब्ध कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याने कायदेशीर तरतुदीनुसार सुपर निमताना अपील दाखल करणे योग्य ठरेल. माहितीच्या अचूकतेच्या पडताळणीसाठी अशा अपिलाचा निर्णय एक महिन्यात होण्याची दक्षता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी घेतली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१.अपील निकाली ठेवण्यात येत आहे.
२.अपीलकर्त्याने म.ज.म.अधिनियम १९६६ च्या कलम २४७ नुसार सुपरनिमताना अपील करुन माहितीच्या नेमकेपणाच्या पडताळणीसाठी दाद मागावी. सदर निमताना संदर्भात एक महिन्याच्या आत निर्णय करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, मावळ, जि. पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,भूमि अभिलेख, जि. पुणे यांची राहील. त्याबाबतचा अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर करावा.

पुणे
दि. १८/०९/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२३/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्रीमती मीरा इतवारी ससाणे,<br>७५१, भवानीपेठ, न्यूताज बेकरीमागे, पुणे -२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नायब तहसीलदार (मागासवर्ग कक्ष),<br>पुणे विभागीय आयुक्त कार्यालय,<br>विधानभवन, पुणे - १ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)<br>पुणे विभागीय आयुक्त कार्यालय,<br>विधानभवन, पुणे - १ | हजर |

अपिलकर्ता श्रीमती मीरा इतवारी ससाणे यांनी दि.०३.०४.२००७ च्या अर्जान्वये कॅम्प एज्युकेशन सोसायटी, पुणे -१ या शैक्षणिक संस्थेच्या प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेज इत्यादी मध्ये संबंधीत मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापकांना पदोन्नती देताना मागासवर्गीय कक्षामधून बिंदूनामावली तपासणी करुन घेतली होती का, अशी विचारणा केली होती व त्यांसदर्भातील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती.

सदर संस्थेची बिंदू नामावली नोंदवह्यांची पडताळणी अद्याप करण्यात आलेली नाही. वस्तुस्थिती स्पष्ट करणारे लेखी निवेदन अपील कर्तीस पाठविले आहे. बिंदुनामावली नोंदवह्या तपासणी बाबत शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर त्वरित पडताळणी करुन दिली जाईल. उपलब्ध सर्व माहिती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (मागासवर्ग कक्ष), पुणे विभाग यांनी दि.२४.०६.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले

आहे. पडताळणी करुन देण्याची बाब (मुद्दा क्र.२,३) माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मोडत नसल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), पुणे विभागीय आयुक्त कार्यालय, विधानभवन, पुणे १ यांनी दिला आहे. तो रास्त आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, तसेच सादर केलेली निवेदने / उपलब्ध कागदपत्रे व प्रथम अपील -निर्णय पाहता सद्यस्थितीची सर्व माहिती जन माहिती अधिकारी व संस्थेने अपीलकर्तीस दिली आहे, असे दिसून येते. शासनाचे मार्गदर्शन शक्य तेवढ्या लवकर प्राप्त करुन घेऊन कार्यवाही पूर्ण झाल्यावर अपीलकर्तीस जन माहिती अधिकारी यांनी त्याची माहिती द्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली ठेवणेत येत आहे.

पुणे
दि. १० /०९/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ